# चाळीसगावात १० महिन्यात अडीच हजार जणांना कुत्र्यांचा चावा

## शहरात वाढती संख्या धोक्यांची घंटा; नियंत्रणासाठी पालिकेडून ९४१ कुत्र्यांवर नसंबदी; शहरात नेमकी किती कुत्री, न.पा.कडून गणना

**चाळीसगाव । मनोहर कांडेकर –**

चाळीसगाव शहरात भटक्या कुत्र्यांचा प्रश्न चिघळला असून कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. गेल्या दहा महिन्यांमध्ये जवळपास २३३४ हून अधिक नागरिकांवर भटक्या कुत्र्यांनी हल्ले करुन चावा घेतल्याची माहिती हाती आली आहे. तर काहीना गंभीर जखमी केल्याची घटना घडल्या आहेत. चाळीसगाव नगरपरिषदेकडून आतापर्यंत फक्त ९४१ कुत्र्यांवर नसबंदी व लसीकरण करण्यात आले आहे. कुत्रा चावल्याची एवढी गंभीर आकडेवारी असतानाही चाळीसगाव आरोग्य विभागाकडे परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रभावी उपाय–योजना नसल्याचे दिसत असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

शहरातील मुख्य रस्त्यांवर भटकी कुत्री रात्रीच्या वेळी मोठमोठ्याने भुंकत रस्त्यावर मोकळे फिरतात, गृह संकुले, झोपडपट्ट्यांमध्ये कुत्रे रात्रभर भुंकतात त्यामुळे अनेक रहिवाशांची झोप उडाली आहे. समस्येत भर घालण्यासाठी, हे कुत्रे अनेकदा सार्वजनिक ठिकाणी घाण करतात, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरते, घाणीमुळे स्थानिकांचे जीवनमान आणखी खालावत आहे. शहरात मागील दहा महिन्यांत साधरणता ;२३३४ हून अधिक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे. या आकडेवारीवरून शहरात कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर कुत्र्यांचे लसीकरण आणि नसबंदी करण्यात येत असल्याचा दावा पालिकेच्या आरोग्य विभागाने केला आहे. चाळीसगाव नगरपरिषदकेडून गेल्या दोन महिन्यापूर्वी एक संस्थेला कुत्र्यांचे निर्बिजीकरण(नसबंदी) व लसीकरण करण्याचा ठेका दिला होता. त्या संस्थेने दोन माहिन्यात फक्त ९४१ कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण करत, त्याचे टॅगींग करून, कुंत्र्याच्या गळ्यात रिफ्लेक्ट पट्टा टाकण्यात आला. यासाठी शहराच्या बाहेर असलेल्या एमआयडीसी येथे कुत्रे निर्बीजीकरण केंद्र सुरु केले होते. त्याठिकाणी नसबंदीसाठी डॉक्टरांसह सहा जणांचे पथक होते. डॉग व्हॅनव्दारे



पकडून नसबंदी झाल्यानतंर पुन्हा त्याचठिकाणी सोडण्यात येत होते. परंतू वर्षभराचा ठेका दिलेला असताना, फक्त दोन महिनेच काम करुन केज जि.बिड येथील ‘ युनिव्हर्सल ॲनिमल वेल्फेअर सोसायटी ’ या खाजगी संस्थेने काम बंद केल्याची माहिती हाती आली आहे. परंतू ते पुन्हा काम सुरु करणार असल्याची देखील माहिती स्वच्छता निरिक्षक सचिन निकुंभ यांनी दिली आहे.

शहरातील बस स्थानकाच्या पाठीमागे, घाट रोड, नागद रोड, कॉलेज पॉईट व इतर ठिकाणी मटण व चिकणची मोठ्या प्रमाणात दुकाने आहेत. या ठिकाणी भटक्या कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणात असतो. तर शहरातील झोपड पट्टी व गल्लीबोळाध्ये देखील कुत्रे रात्रीची दहशत माजवतात, नारायणवाडी परिसरात अनेकदा कुत्र्यांनी नागरिकांवर रात्रीच्या वेळी हल्ला केल्याच्या घटना घडल्या आहेत. चाळीसगाव शहरासह ग्रामीण भागात देखील कुत्र्यांची संख्या कमालीची वाढत असल्याचे बोलले जात आहे, ग्रामीण भागापेक्षा शहरात हल्ल्याची घटना आधिक घटल्या आहेत. विशेष म्हणजे चाळीसगाव शहरात नेमके किते कुत्रे आहेत. याची गणनाच चाळीसगाव पालिकेकडून आतापर्यंत करण्यात आलेले नसल्याची धक्कदायक माहिती मिळाली आहे. शहरातील कुत्र्यांची गणना नसल्यामुळे पालिकेला देखील शहरातील नमेकी किती पाळीव व भटके कुत्री आहेत, याचा अंदाज आलेला नाही. पालिकेडून आता पर्यत दोन माहिन्यात फक्त ९४१ कुत्र्यांवर नसबंदी शस्त्रक्रिया केली आहे. परंतू कुत्र्यांकडून करण्यात येत असलेल्या घाणीचा विषय मात्र गंभीर आहे.

**दहा महिन्यात कुत्रा चावल्याची आकडेवारी-**

२०२४ एप्रिल–२४७, मे–२०६, जुन २१६, जुर्ले–१८४, ऑगस्ट–२०५, सप्टेंबर–२००, ऑक्टोंबर–३०५, नोव्हेंबर–२६२, डिसेंबर –२४४, जानेवारी(२०२५)–२६५ जाणांना कुत्र्यांचा चावा. या आकडेवारीवरुन साधरणता; २३३४ जणांहुन आधिक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याचे माहिती प्राप्त झाली आहे. तर चाळीसगाव ग्रामीण रुग्णालयात कुत्र्या चावल्यानतंर टोचण्यात येणारे इजेक्शनचा ५७०० लसेसचा साठा उपलब्ध असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. कुत्रा चावल्या नतंर रेबीज या आजाराचा धोका जगभरात आहे. या आजारामुळे दरवर्षी जवळपास ६० हजार लोकांचा मृत्यू होतो. जागतिक आरोग्य संघटनानुसार यातील ९९ टक्के प्रकरणं कुत्रा चावल्यामुळे किंवा कुत्र्यानं ओरखडल्यामुळे होतात.

**त्वरित उपया-योजना होईल का?-** गेल्या दहा महिन्यांच्या आकडेवारीवरुन सरासरी दर महिन्याला चाळीसगाव शहरात २०० जणांना कुत्रानी चावा घेतल्याचे दिसत आहे. त्यामुळे चाळीसगाव नगरपरिषदेकडून कुत्र्यांची नसबंदी व नियंत्रणाबाबत गोगलगाईप्रमाणे चाललेल्या उपया–योजना पाहता, भविष्यात चाळीसगाव शहरात कुत्र्यांची संख्या प्रचंड वाढलेली दिसेल. तर कुत्र्यांच्या चाव्यामुळे अनेकांना जिव देखील जमवाला लागू शकतो. त्यामुळे नसबंदी व लसीकरणाची मोहिम जोरात सुरु करुन शहरातील कुत्र्यांची गणना करण्यात यावी. तसेच कुत्रा पाळणाऱ्यांना देखील सक्त ताकीत देवून, कुत्र्याचा घाणीबाबत कडक सुचना देण्यात याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. चाळीसगाव पालिकेडून आतापर्यंत भटक्या कुत्र्यांची गणनाच करण्यात आली किवा त्यांच्याकडे आकडेवारी नाही, हा विषयी गंभीर आहे. तरी देखील न.पा.मधील आतापर्यंत खुर्च्या गरम करणारे, पालिकेच्या बैठकांमध्ये नागरिकांच्या पैशांवर चहाँ व नाष्ट्यावर ताव मारणारे सत्ताधारी व विरोधक आजी–माजी नगरसेवक, नगराध्यक्षकांनी काय–कामकाज केले ? याबाबत प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे. गेल्या अनेक वर्षांमध्ये कुत्र्यांची गणना का ? झाली नाही. किवा हा विषयी पालिकेचा आहे का ? नाही. याबाबत काय? उपाय–योजना करण्यात आली. याबाबत सभागृहात का ? प्रश्न उपस्थित केले नाहीत, असे अनेक मुद्दे आता यानिमित्ताने पुढे येणार आहेत.



# अमळनेरचा दादू भगत बनला श्री महंत हरिहरा नंदगिरी महाराज

**अमळनेर । प्रतिनिधी**

येथील दादू भगत ला आंतरराष्ट्रीय किन्नर आखाड्याचे महामंडलेश्वर आचार्य लक्ष्मीनारायणजी त्रिपाठी यांच्या आदेशाने आखाड्याचे उपाध्यक्ष पार्वती नंदगिरी महाराजांनी अमळनेर येथील दादू भगत यास किन्नर आखाड्याची श्री महंत पदवी बहाल करण्यात आली असून त्यांना अभिषेक देऊन त्याचे नामकरण श्री महंत हरीहरा नंदगिरी महाराज उर्फ दादू भगत असे करण्यात आले आहे. दादू भगत यांचे खान्देश सह गुजरात मध्ये भक्त आहेत. या पदवी ने त्यांच्या भक्तांमध्ये आनन्द पसरला आहे.



# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रणाईचे येथील वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**अमळनेर । प्रतिनिधी**

दि.३० जानेवारी रोजी जि. प. प्राथमिक शाळा रणाईचे येथील वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन जानवे केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.शरद जानकीराम सोनवणे व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. सुभाष धरमदास राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमात गणेश वंदना, कालीबिंदी, मेरा रंग दे बसंती चोला, वेंगळ लागे मजेदार, जातेन आतेम बंजारा गीत, कोळीगीत, शिवकन्या इत्यादी गाण्यांवर बहारदार नृत्य व सासु सुनेचे नाटक चिमुकल्यांनी सादर केले. रणाईचे बुद्रुक व रणाईचे खुर्द गावातील रसिक प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद कलाविष्कार कार्यक्रमास मिळाला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सतीश ढोले, शत्रुघ्न रोकडे, वैशाली पाटील, प्रतिभा पाटील, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. महेंद्र पाटील सर यांनी केले.

# निसार्गा रिन्यूएबल एनर्जी प्रायव्हेट लिमिटेडतर्फे १४ लोकांना कृत्रिम हाथ

**पारोळा । श. प्र;**



जळगाव, २७ जानेवारी २०२५ जळगाव येथील रोटरी हॉल पूर्व, गणपती नगर येथे एक हृदयस्पर्शी उपक्रम आयोजित करण्यात आला होता, जिथे निसाग्र रिन्यूएबल एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड आणि ज्युनिपर ग्रीन एनर्जी यांच्या सहकार्याने उडठ ॲक्टिव्हिटी द्वारे कृत्रिम अवयव वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. गरजूंना कृत्रिम अवयव प्रदान करून, त्यांना गतिशीलता आणि स्वातंत्र्याची नवीन भावना देऊन त्यांचे जीवन बदलण्याचा या उदात्त कार्यक्रमाचा उद्देश होता.

या शिबिराला स्थानिक समुदायाकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला. तज्ञांच्या पथकांनी लाभार्थ्यांना त्यांच्या गरजांनुसार उच्च दर्जाचे कृत्रिम अवयव बसवले आहेत याची खात्री केली. या कार्यक्रमाने निसाग्र रिन्यूएबल एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड आणि ज्युनिपर ग्रीन एनर्जी सारख्या कॉर्पोरेट संस्थांची उडठ ॲक्टिव्हिटी द्वारे सामाजिक कल्याण आणि समावेशक विकासासाठी वचनबद्धता अधोरेखित केली.

या कार्यक्रमात बोलताना, शारीरिक आव्हाने असलेल्या व्यक्तींचे जीवनमान सुधारण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. लाभार्थ्यांनी त्यांना दिलेल्या पाठिंब्याबद्दल आणि काळजीबद्दल अपार कृतज्ञता व्यक्त केली. कार्यकामात निसाग्रा कंपनी तर्फे जनरल मॅनेजर कृष्णा नल्लानी सर आणि माननीय आमदार साहेब सुरेश दामू भोले (राजुमामा) व ज्ञानेश्वर ढेरे (महानगरपालिका अध्यक्ष जळगाव) यांच्यामार्फत १४ गरजू व्यतिना सागर दत्तू, रेखा कुंभाकर, मनोहर गायकवाड, एकनाथ तुपे, भारतलाल द्वेदी, गणेश देवरा, नशीब वळवी, संतोष उंभाकर, संतोष ढमे, आरती सोनवणे, निलेश गावील, रेवनाथ शितोळे, शुभम निंबोने, आनंदा सोनवणे यांना कुत्रीम हात देण्यात आले.

या प्रभावी उपक्रमाने केवळ प्रजासत्ताक दिन साजरा केला नाही तर मानवता आणि समावेशकतेच्या मूल्यांनाही बळकटी दिली. सहयोगी प्रयत्नांमुळे समाजात कसा महत्त्व–पूर्ण बदल घडू शकतो याची आठवण करून देणारे हे काम आहे.



# अभ्यास आणि लेखन तंत्र हमखास गुणांची हमी - एस.एस. पाटील

**धरणगाव । प्रतिनिधी**

शालांत परीक्षेत जास्तीत जास्त गुण मिळवण्याठी परिपूर्ण अभ्यास हवाच शिवाय पेपर लेखनाचे तंत्रही अवगत हवे असे प्रतिपादन मुख्याध्यापक एस. एस. पाटील यांनी केले. ते येथील सारजाई कुडे व बालकवी ठोंबरे विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जा–ताना या विषयावर मार्गदर्शन करतांना बोलत होते. अभ्यास आणि लेखन तंत्र म्हणजे हमखास गुणांची हमी असे ते म्हणाले.

परिक्षेला जातांना विद्यार्थ्यांनी कोणकोणती तयारी करावी. अभ्यासपूर्ण पद्धतीने व हिमतीने सामोरे कसे जावे. वर्षभरात आपण आपल्या विषय शिक्षकांकडून जे विषयाचं ज्ञान ग्रहण केलेले असते, त्यावर मंथन करून निर्भीडपणे पेपर कसा लिहावा आणि उत्तमपणे पेपर सोडवावा याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक जीवन पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी व इयत्ता दहावीतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण पाटील यांनी तर आभार ए डी पाटील यांनी मानले.

# माध्यमिक विद्यालय सार्वे बाभळे शाळेत आनंद मेळावा

**पारोळा । श. प्र.**



तालुक्यातील सार्वे –बाभळे येथील ज्ञानदीप बहुउद्देशी विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालयात ज्ञानदीप संस्थेचे अध्यक्ष भैय्यासाहेब पवार यांच्या संकल्पनेतून आनंद मेळावा उत्साह साजरा करण्यात आला.

आनंद मेळावे उद्धाघाटन ज्ञानेश्वर माळी,नाना पाटील यांचे शुभ हस्ते करण्यात आले. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ तयार करून सहभाग घेतला.

या उपक्रमामुळे मुलांना नवनिर्मितीच्या आनंद तर मिळालाच शिवाय खरेदी–विक्री, नफा तोटा, मूलभूत गणिती क्रिया याचे प्रत्यक्ष व्यवहार ज्ञान सुद्धा त्यांना मिळालं .व त्यांनी प्रत्यक्ष व पालकांच्या मदतीने तयार केलेले खाद्यपदार्थ विकताना त्यांना अतिशय आनंद होत होता. त्या ठिकाणी जवळप–ास ३० स्टॉल होते .व गा–वातील ग्रामस्थ तसेच विद्यार्थी स्टॉलवर जाऊन खाद्यपदार्थांची मेजवानी घेत होते. विविध खाद्यपदार्थ विद्यार्थ्यांनी घरून तयार करून आणले होते.

या आनंद मेळाव्याला सार्वे, बाभळे, बाहुटे,सांगवी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच आनंद मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील मुख्याध्यापक दिपक पाटील, श्रीमती .कविता सोनवणे, श्रीमती मोनाली पाटील, रंगराव. पी. साळुंखे , बाळासाहेब एस. निकुंभ, सचिन ए .पाटील, हरीश एस पाटील, दीपक एस. पाटील, श्रीमती शालिनी पाटील निलेश .एस.पाटील, उमाकांत बाविस्कर , सुनील पाटील आदीनी परिश्रम घेतले.



# माजी आ. जगन्नाथजी शिंदेंच्या वाढदिवसानिमित्त पथराड जि.प.शाळेला प्रथमोपचार पेटी भेट

**गुढे, ता.भडगाव । वार्ताहर**

केमिस्ट हृदयसम्राट तथा माजी आमदार जगन्नाथजी शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त चाळीसगाव तालुका मेडिकल असोशिएशनच्यावतीने ग्रामीण भागातील ज्या गावात आरोग्य सेवा उपलब्ध नाही अशा गावातील जि.प. प्राथमिक शाळांना प्रथमोपचार पेटी भेट देण्यात आल्या यात पथराड या शाळेत प्रथमोपचार पेटी नुकतीच भेट देण्यात आली.यावेळी चाळीसगाव तालुका मेडिकल असोशिएशन अध्यक्ष तथा नानासो. कृ.दे.पाटील स.मा.वि.गुढे शाळेचे स्कूल कमिटी चेअरमन योगेश भोकरे,विनोद जैन, महेश येवले, रोटरी इन्क्लेव्हचे पर्सन रविंद्र शिरोडे, मंगेश महाजन, महेश कुमट जि.प.कन्या शाळेचे शिक्षक सुदाम पाटील आदी उपस्थित होते.



# गुढे येथे ग.स.सोसायटीच्या वतीने राजमाता जिजाऊ शुभमंगल योजनेंतर्गत सभासदांना धनादेश भेट

**गुढे, ता.भडगाव । वार्ताहर**

जळगाव जिल्हा सरकारी नोकरांची सहकारी पतपेढी लि.जळगांव यांच्यावतीने ग.स.सोसायटीने पाल्यांसाठी राजमाता जिजाऊ शुभमंगल योजनेंतर्गत येथील रहिवासी पाटबंधारे विभागाचे सेवानिवृत्त कालवा निरीक्षक माधवराव श्रावण माळी यांच्या मुलांच्या विवाह प्रित्यर्थ नुकताच ५ हजारांचा धनादेश ग.स.सोसायटीचे माजी व्हा.चेअरमन व विद्यमान संचालक रवींद्र सोनवणे यांच्या हस्ते नुकताच गुढे येथे घरपोच देण्यात आला याप्रसंगी गावातील ग्रा.प.माजी सदस्य किसन निंबा माळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुकाराम चौधरी आदी उपस्थित होते.

# पारोळा महामार्गावरील बायपास वर कार उलटली

**पारोळा । श. प्र.**

येथील राष्ट्रीय महामार्गावरील बायपास वर धरणगाव चौफुली च्या पुढे धुळ्याकडून जळगाव कडे जाणारी कार आज दिनांक १ फेब्रुवारी रोजी पहाटे साडेचार वाजेच्या सुमारास अचानक उलटली.

याबाबत धुळ्याकडून जळगाव कडे जाणारी स्विफ्ट डिझायर कार क्रमांक एम एच १९ बी यु ७० ३० हि आज दिनांक एक फेब्रुवारी रोजी पहाटे साडेचार वाजता अचानक उलटली एवढ्या सकाळी कोणीच नसल्याने सदर कार मधील प्रवासी हे कुठल्याही दवाखान्यात आढळून आले नाही तर कारचे लाईट सुरू असून कार देखील चालू होती सकाळी पोलिसांनी येऊन तपास केला असता कुणीच कार मालक चालक प्रवासी मिळून आले नाही. पोलिसांनी क्रेनच्या सहाय्याने कार सरळ करून पारोळा पोलीस ठाण्यात जमा केली आहे याबाबत उशिरापर्यंत गुन्हा नोंदविण्यात आलेला नव्हता.

# ऑक्सिजन निर्मितीसाठी शेतकऱ्यांना वृक्ष अनुदान योजना सुरू करा!

## माजी आ.साहेबराव पाटील यांच्यासह पुष्पलता पाटील यांची शासनाकडे मागणी

**अमळनेर । वार्ताहर**

मुख्यमंत्री –माझी लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर शेतकऱ्यांच्या बांधावरील वृक्ष संवर्धनासाठी कार्बन मूल्य ठरवून वृक्ष अनुदान योजना राबवण्यात यावी अशी मागणी पर्यावरण प्रेमी माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील व जिजामाता कृषिभूषण पुष्पलता पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सह उपमुख्यमंत्री ,मंत्री सह सचिवांकडे निवेदनाद्वारे केली आहे.*

निसर्गाशी असलेली कटीबद्धता निश्चित करण्यासाठी निसर्गाशी संबंधित पंचतत्वावर आधारित उपाययोजना करून शाश्वत निसर्गपूर्वक जीवनपद्धती अवलंबण्यासाठी , मानव जीवन आणि शेती क्षेत्रावर होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी शेतकरी आपली शेती शाबूत ठेवून ,शेतीत टिकण्यासाठी उत्पादन उत्पादकता वाढवण्यासाठी वातावरणातील बदलामुळे शेती क्षेत्रावर होणारे दुष्परिणाम कमी व्हावेत. यासाठी शेतीच्या बांधावर विविध प्रजातींची लागवड व संवर्धन करून पर्यावरणाचा समतोल साधण्याच्या दृष्टीने मोठे यो–गदान देत आहेत. आम्ही आमची शेती शाबूत ठेवून आमच्या शेतीत ११ हजार साग ,५ हजार महोगणी व अन्य जातीच्या वृक्षांची लागवड करून हिरवा वर्तमान म्हणजे राजवड शिवार वनराईत साकारलय. आमचा वनशे–तीचा अनुकरणीय पथदर्शी ऑक्सिजन पार्क म्हणजे राज व शबरी फार्म होय.

म्हणून महाराष्ट्र शासन राबवत असलेल्या संजय गांधी , इंदिरा गांधी ,श्रावण बाळ , विधवा , दिव्यांग योजना व अलीकडील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या धर्तीवर वातावरणातील कार्बन उत्सर्जनामुळे होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी , वृक्ष आच्छादन वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना त्यांच्या स्व मालकीच्या सात बारावर नोंद असलेल्या बांधावरील वृक्ष संवर्धनासाठी कार्बन मूल्यांकनानुसार मूल्य ठरवून शाश्वत निसर्गपूर्वक वृक्ष अनुदान योजना सुरू करण्यास मान्यता द्यावी अशी मागणी साहेबराव पाटील ,पुष्पलता पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह वन मंत्री ,महसूल मंत्री ,पर्यावरण मंत्री विविध मंत्रालयाचे सचिव व वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

केंद्रशासनाने देखील गेल्या वर्षी १९८६ च्या पर्यावरण संरक्षण ग्रीन क्रेडिट अधिनियम २०२३ बाबत अधिसूचना प्रसिद्ध केली होती. शासनाच्या वृक्ष अनुदान योजनेमुळे वृक्ष तोडीला लगाम बसणार आहे. आणि ऑक्सिजन निर्मिती होऊन पर्यावरण समतोल साधला जाईल.



# श्री व्यंकटेश मा. विद्यालयाची शैक्षणीक सहल

**पारोळा । श. प्र.**

येथील श्री व्यंकटेश माध्यमिक विद्यालय धरणगाव रोड पारोळा या शाळेची शैक्षणिक सहल लालपरी बसने एकुण ४२ विद्यार्थ्यांनां सप्तशृंगी नांदुरी गड,दिंडोरी,नासिक दर्शन मधे पांडव लेणी,बुद्ध विहार,फाळके स्मारक,पंचवटी. काळाराम मंदिर,सीता गुफा या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना भेटी दिल्या.या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती मुख्याध्यापक उध्दव पाटील व राहुल सूर्यवंशी यांनी दिली.आजही या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना देश विदेशातून पर्यटक भेट देतात अशी माहिती सहल प्रमुख योगेश पारधी यांनी दिली. सहल यशस्वितेसाठी सुनिता राठोड, कविता पाटील, शुभम पाटील, अतुल मराठे ,सुनिल शामनाणी, शुभांगी पाटील, पल्लवी पाटील,शरद दे–वरे, रामदास दाभाडे, विरेंद्र पवार यांनी परिश्रम घेतले एस.टि.बस चालक दिलीप पाटील यांचा सत्कार संस्थाध्यक्ष रावसाहेब भोसले , मुख्याध्यापक उध्दव पाटील व राहुल सूर्यवंशी यांनी केला.सहल यशस्वी झाल्याबद्दल सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन संस्थेचे सचिव हेमंतकुमार पाटील व उपाध्यक्षा सरिता भोसले यांनी केले.